**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७२ /२०१८** | **दिनांक ०७/०९/२०१८** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०९/२०१८ ते ०७/०९/२०१८) | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०८/०९/२०१८ सकाळी ८:३० पासून १२/०९/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०९ | ०४/०९ | ०५/०९ | ०६/०९ | ०७/०९ | | ०८/०९ | ०९/०९ | १०/०९ | ११/०९ | १२/०९ |
| ४.४ | ५.० | ०.० | २.० | २.० | पाऊस (मिमी) | २ | २ | १ | ० | ० |
| ३०.० | ३०.२ | ३०.२ | ३०.२ | ३०.० | कमाल तापमान (अं.से) | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २४.६ | २४.८ | २५.६ | २५. ४ | | किमान तापमान (अं.से) | २४ | २५ | २४ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ६ | ५ | ४ | ५ | ४ |
| ८९ | ८५ | ८६ | ८४ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८४ | ८३ | ८५ | ८६ | ८४ |
| ८८ | ७८ | ७९ | ७७ | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७३ | ७३ | ७२ | ६८ | ६८ |
| - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ९ | ७ | ६ | ७ |
| - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | नै. प. | नै. द. | नै. द. | नै. द. | नै. द. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | | |
| १३.८ | | | | | २३४७.० | | २८३४.२ | | | |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ८ ते १२ ऑगस्ट २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक ८ ते १२ ऑगस्ट २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक ८ ते १२ ऑगस्ट २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ६ ते ९ किमी प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पोटरी ते लोंबी बाहेर येण्याची अवस्था | हळव्या जातीचे भात पसवून दाणे भरू लागले असतील तर भात खाचरात ५ से.मी. पाणी राहील या बाबीकडे लक्ष द्यावे.<br>भात पिकामध्ये जस्ताचा कमतरतेमुळे पानांची टोके तांबडी झालेली दिसून येत असल्यास ०.२% झिंक सल्फेट २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>भात पिकामध्ये पिवळ्या खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या नियंत्रणासाठी कारटॅप हैड्रोक्लोराइड ५० टक्के २० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| नागली | फुटवे अवस्था | नागली पिकाच्या वाढीसाठी पोषक हवामान राहील. |
| आंबा | वाढीची अवस्था | आंब्याच्या एक वर्ष वयाच्या कलमास १ घमेले कुजलेले शेणखत अधिक ३०० ग्रॅम युरिया अधिक ९४० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट अधिक १०० ग्रॅम पोटॅश खते झाडापासून ३० सेमी अंतरावर चरातून द्यावीत. |
| नारळ | वाढीची अवस्था | नारळाच्या लहान रोपांमध्ये कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी कुजलेला कोंब स्वच्छ करून त्यावर एक टक्का बोर्डोमिश्रण ओतावे. |
| मसाले पिके | वाढीची अवस्था | लवंग पिकावर शेंडेमर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा व एक टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>जायफळाची पक्व फळे रोजच्या रोज गोळा करावी आगर काढावी.टरफल कडून जायपत्री व जायफळ बी वेगळी करावी. |
| फळबाग रोपवाटिका | | पावसाचे प्रमाण कमी असल्याने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | · | शेळ्यांमध्ये जंताचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता आहे. त्यासाठी शेळ्यांना अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.** | | |